शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.५१/२०१८

| | | |
|---|---|---|
| श्री.शिंदे दत्तात्रय शंकर | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द | | |
| १. कोयना शिक्षण संस्था, पाटण, जि.सातारा<br>२. बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि.सातारा. | } | वि.प. |

कोयना शिक्षण संस्था, पाटण, जि. सातारा यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. शिंदे दत्तात्रय शंकर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०१/११/२०१७ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. सन ०१/०१/२००६ पासून सहवा वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळालेले नाही व केवळ नाममात्र पगार ४५००-६००० इतके दिलेले आहे.

२. दि.१२/०१/१९९९ पासुन कोयना शिक्षण संस्था पाटण संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटण येथे शिपाई या पदावर नाममात्र पगारावर काम करत असून मला दि.०२/११/२००६ पासून अध्यक्षांच्या तोंडी आदेशानुसार बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे रूजू होवून काम करत आहे.

३. तरी दि.०१/०१/२००६ पासून सहावा वेतन आयोगानुसार आत्तापर्यंतचे पगार मिळालेले नाही.

**संस्थेचा अभिप्राय :**

१. संबंधित सेवक महाविद्यालयाच्या कायम अथवा मंजूर पदावर कार्यरत नाही.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालयाने अभिप्राय दिलेला नाही.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तूत तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी दि.०१/०१/२००६ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळालेले नाही. नाममात्र पगार ४५००-६००० इतके दिले आहे. संस्थेच्या अध्यक्षांच्या तोंडी आदेशावरून दि.०२/११/२०१६ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटण या महाविद्यालयातून बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण येथे बदली करण्यात आली अशा तक्रारी नमूद केल्या आहेत.

याबाबत संस्थेच्या लेखी म्हणण्यामध्ये असे कथन आहे की, तक्रारदार यांनी स्वतःहून दि.०२/११/२०१६ पासून बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण येथे कामास सुरवात केली आणि त्यांना तसे संस्थेचे कोणतेही लेखी आदेश नव्हते. तसेच संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटण बंद पडल्यामुळे त्यांची सेवा समाप्त झाली आहे. तक्रारदार हे दि.२७/१०/२०१६ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटण येथे कामावर गैरहजर होते. तसेच तक्रारदार यांनी दि.२६/०४/२०१७ रोजी दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र हे खोटे व चुकीचे आहे.

समितीने दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता यामध्ये तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत दि.१५/०३/१९९९ रोजीचा संस्थेचा नियुक्ती आदेश जोडला आहे. सदर नियुक्ती आदेशावरून तक्रारदार यांची नियुक्ती संस्थेकडे शिपाई या पदावर परिविक्षाधी कालावधीकरिता झालेचे दिसून येते. तसेच तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०१६ चे बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण यांचेकडील हजेरीपत्रक व दि.०१ ऑक्टोंबर २०१६ ते ११ ऑगस्ट २०१७ पर्यंतचे दि पाटण अर्बन को-ऑप बँक लि. पाटण या बँकेतील महाविद्यालयाने अदा केलेल्या पगाराचे स्टेटमेंट जोडले आहे. या स्टेटमेंट मध्ये बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण यांचेकडून तक्रारदार यांचे खातेवर नोव्हेंबर, २०१६ पासून ते मे, २०१७ पर्यंत रू.४,५००/- प्रती महिना इतकी रक्कम अदा केली असल्याचे तसेच जून, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ मध्ये रू.६,०००/-प्रती महिना इतकी रक्कम अदा केली असल्याचे निदर्शनास येते.

संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये तक्रारदार यांच्या सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत जोडली असून त्यामध्ये दि.३१ मार्च २०१७ पर्यंतच्या वेतनवाढी तसेच दि.३१ मार्च २०१८ पर्यंताच्या प्राचार्यांच्या सहीच्या नोंदी दिसून येतात. संस्थेने कथन केलेनुसार तक्रारदार हे दि.२७ ऑक्टोंबर २०१६ पासून कामावर गैरहजर होते. तथापि तक्रारदार यांनी बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण यांचेकडील नोव्हेंबर, २०१६ चे हजेरी पत्रक जोडले आहे. त्यावर तक्रारदार यांच्या सह्या व बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण या महाविद्यालयाच्या प्राचार्यांची सही, शिक्का असल्याचे दिसून येते. तसेच तक्रारदार

यांनी दि.०१ ऑक्टोंबर २०१६ ते ११ ऑगस्ट २०१७ पर्यंतचे दि पाटण अर्बन को-ऑप बँक लि. पाटण या बँकेतील पगाराचे स्टेटमेंट जोडले आहे. त्यावरून तक्रारदार यांचे खातेवर दि.०१ ऑक्टोंबर २०१६ ते ११ ऑगस्ट २०१७ या कालावधीत प्राचार्य, बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण यांचेकडून काही रक्कमा जमा केल्याचे दिसून येते. संस्थेच्या म्हणण्यानुसार तक्रारदार दि.२७ ऑक्टोंबर २०१६ पासून संस्था, महाविद्यालयाच्या पुर्वपरवानगी शिवाय कामावर गैरहजर असतील तर मग संस्थेच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण या महाविद्यालयातून तक्रारदार यांचे बँक खातेवर सॅलरी या शिर्षकाखाली ऑक्टोंबर, २०१६ ते ऑगस्ट २०१७ पर्यंत दरमहा रक्कम जमा का करण्यात आली आहे याची स्पष्टता संस्थेकडून झालेली नाही. तसेच तक्रारदार दि.२७ ऑक्टोंबर २०१६ पासून कामावर गैरहजर होते तर त्यांचेवर संस्थेने सेवा नियमानुसार कारवाई करणे आवश्यक होते. अशी कोणतीही कारवाई करण्यात आल्याची कागदपत्रे संस्थेने समितीसमोर सादर केलेली नाहीत. तसेच तक्रारदार यांनी सादर केलेले नोव्हेंबर, २०१६ मधील बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण यांचेकडील हजेरीपत्रक व दि पाटण अर्बन को ऑप लि. बँकेचे स्टेटमेंट या बाबी संस्थेने नाकारलेल्या नाहीत. यावरून संस्थेने तक्रारदार दि.२७ ऑक्टोंबर २०१६ पासून कामावर गैरहजर आहेत असे जरी म्हटले असले तरी उपरोक्त सर्व घटनाक्रम विचारात घेता तक्रारदार हे दि.२७ ऑक्टोंबर २०१६ पासून संस्थेच्या सेवेत असल्याचे समितीच्या निदर्शनास येते.

तसेच संस्थेने तक्रारदार यांना दिलेल्या नियुक्ती आदेशामध्ये अनुदानित अथवा विनाअनुदानित तसेच त्यांची कोणत्या महाविद्यालयावर नियुक्ती केली आहे याबाबतचा उल्लेख दिसून येत नाही. सबब तक्रारदार यांची संस्थेने नियुक्ती केली असल्याने तक्रारदार यांचेकडून कोणत्या महाविद्यालयावर काम करून घ्यायचे याचे अधिकार संस्थेला आहेत.

तक्रारदार हे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटण येथे सन १९९९ पासून कार्यरत होते. दि.२ नोव्हेंबर २०१६ पासून संस्थेच्या अध्यक्ष्यांच्या तोंडी आदेशावरून संस्थेच्याच बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण येथे बदली करण्यात आल्याचे त्यांनी कथन केले आहे. तथापि याबाबत संस्थेकडून बदलीबाबतचे तसे लेखी आदेश घेणे, सेवापुस्तकात त्याबाबत नोंदी करून घेणे इत्यादी आवश्यक होते. तशी कोणतीही कार्यवाही अथवा पाठपुरावा संस्था, महाविद्यालयाकडे तक्रारदार यांनी केल्याचे दिसून येत नाही.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये सन २००६ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळणेची मागणी केलेली आहे. परंतू यापुर्वी त्यांनी सन २००६ पासून ते अर्ज दाखल दिनांकापर्यंत सहाव्या वेतन

आयोगानुसार आपणास वेतन मिळावे अशी मागणी अथवा तक्रार संस्था, महाविद्यालयाकडे केल्याचे निदर्शनास येत नाही. संस्थेकडून तक्रारदार यांना ते नियमित सेवेत असताना त्यांना नाममात्र पगार देण्यात येत असेल तर याबाबत त्यांनी वेळावेळी संस्थेकडे लेखी मागणी अथवा तक्रार करणे आवश्यक होते. संस्था जो पगार तक्रारदार यांना देत होती तो विनातक्रार ते अर्ज दाखल दिनांकापर्यंत स्विकारत होते असे स्पष्ट होते. तक्रारदार यांनी सन २००६ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळणेची मागणी केली असली तरी त्यांची मागणी मुदतीच्या कायद्याप्रमाणे तीन वर्षापर्यंत मान्य करता येईल. सबब समिती या निष्कर्षापर्यंत येते की, तक्रारदार यांना त्यांनी समितीकडे तक्रार अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून मागील तीन वर्षापर्यंतचे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे होणारे वेतन अदा करता येईल. करिता समिती खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

तक्रारदार यांची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळणेची केलेली मागणी नोव्हेंबर २०१४ पासून मान्य करण्यात येत आहे. संस्थेने तक्रारदार यांची नोव्हेंबर २०१४ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती करून त्यांना देय वेतनाच्या फरकाचा तक्ता तयार करावा व त्यांना अदा केलेली रक्कम वजा करून फरकाची रक्कम आदेशापासून तीन महिन्यांच्या आत अदा करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 31 JUL 2023

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
( डॉ.एस.पी.हंगिरगेकर )

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोळेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)